**ठळक बातम्या**

- जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेचं एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकतं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रतिपादन

- राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिन्यांची मुदतवाढ

- मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात, सीएसएमटी परिसरात वाहतूक कोंडी

- जालना जिल्ह्यात जाफराबाद तालुक्यामध्ये गाडी विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात ५ जण ठार, २ जण जखमी

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम

**<><><><>**

जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेचं एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकतं असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्र्यांनी आज जपानची राजधानी टोकियो इथं भारत जपान आर्थिक मंचाला संबोधित केलं. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवत आहे, तसंच आता भारत आपल्या संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रांनंतर, अणुऊर्जा क्षेत्रही खासगी क्षेत्रासाठी खुलं करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांनीही या मंचाला संबोधित केलं. जपानचं प्रगत तंत्रज्ञान आणि भारताची प्रतिभा एकमेकांना पूरक असल्याचं ते म्हणाले. भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमात अनेक जपानी कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. दोन्ही देशांमध्ये झालेले नवे सहकार्य करार हे भारतात गुंतवणूक वाढवण्याच्या जपानच्या वचनबद्धतेचं प्रतिक असल्याचंही ते म्हणाले.

या शिखर परिषदेदरम्यान, दोन्ही नेते परस्परांतल्या द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणार आहेत. तसंच गेल्या ११ वर्षांत वृद्धिंगत होत असलेली धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी पुढे नेण्याच्या दृष्टीनंही चर्चा होण्याची अपेक्षा आहे. जपानच्या दौरा आटोपून प्रधानमंत्री चीन दौऱ्यावर जाणार आहेत. तिथं ते तियानजिन इथं होणार असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ते सहभागी होतील.

<><><><>

आज देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जात आहे. क्रीडा दिनाच्या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून प्रधानमंत्र्यांनी ज्येष्ठ हॉकी खेळाडू मेज ध्यानचंद यांना श्रद्धांजली अर्पण केली. आजही युवा पिढ्यांना मेजर ध्यानचंद यांच्यापासून प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी संदेशात नमूद केलं आहे. देशातील खेळाडूंना पाठबळ देणं, पायाभूत सुविधा निर्माण करणं आणि भारताला उत्कृष्ट क्रीडांचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी केंद्र सरकार यासाठी वचनबद्ध असल्याचं ही प्रधानमंत्र्यांनी संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली या दोघांनीही आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी त्यांना पदाची शपथ दिली. दोन दिवसांपूर्वी सरकारने त्यांची नियुक्ती मंजूर केली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २७ तारखेला या दोन्ही न्यायमूर्तींच्या नियुक्तीला मंजुरी दिली होती. यामुळे आता सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांसह मंजूर न्यायाधिशांची संख्या ३४ झाली असून, न्यायालयासाठी मंजूर पूर्ण क्षमताही गाठली गेली आहे.

<><><><>

राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. मुख्य सचिवांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारनं केंद्र सरकारला पाठविला होता. या प्रस्तावाला केंद्रानं मान्यता दिली. यामुळे राजेश कुमार यांना १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ असा वाढीव काळ मिळणार आहे. नियमित वेळापत्रकानुसार ऑगस्ट अखेरीस ते सेवानिवृत्त होणार होते. १९८८ बॅचचे सनदी अधिकारी असणाऱ्या राजेश कुमार यांनी ३० जून २०२५ रोजी राज्याच्या मुख्य सचिव पदाची सूत्रे स्वीकारली होती.

<><><><>

रुपयाच्या मूल्यात स्थैर्य राखण्याच्या उद्देशानं भारतीय रिझर्व्ह बँकेनं जून महिन्यात परकीय चलन बाजारात आपल्याकडचा ३.६६ अब्ज डॉलर इतक्या परकीय चलनाची विक्री केली. भारतीय रिझर्व्ह बँकेनं मासिक बातमीपत्रात ही माहिती दिली आहे. जून महिन्यात अमेरिकेकडून आकारल्या जाणाऱ्या आयात शुल्काबाबत मोठी अनिश्चिततेची परिस्थिती होती तसंच परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून आपली गुंतवणूक काढून घेतल्यानं रुपयावर दबाव निर्माण झाला होता, या परिस्थितीत ही कार्यवाही केल्याचं या बातमीपत्रात म्हटलं आहे.

त्यानंतर जुलै महिन्यात प्रमुख विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या चलनांच्या तुलनेत भारताच्या रुपयात सर्वात कमी अस्थिरता दिसून आली, तर ऑगस्टमध्ये स्टँडर्ड अँड पुअर्स अमेरिकी पतमानांकन संस्थेनं भारताच्या सार्वभौम मानांकनातल्या सुधारणेची घोषणा केल्यानंतर भारतीय रुपयाच्या मुल्यात काही प्रमाणात वाढ झाल्याचंही या बातमीपत्रात म्हटलं आहे.

<><><><>

एन. आय. ए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने शस्त्रास्त्र तस्करी रॅकेट प्रकरणात एका प्रमुख आरोपीला अटक केली आहे. आरोपी मंजूर खान उर्फ बाबू भाई याला नागालँडहून बिहारमध्ये एके-४७ असॉल्ट रायफल्ससह अत्याधुनिक प्रतिबंधित बोअर शस्त्रे तस्करी करण्यासाठी कट रचल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे.

<><><><>

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात केली. उपोषणाला सुरुवात करण्याआधी जरांगे पाटील यांनी आंदोलकांना संयम पाळण्याचं आवाहन केलं. आंदोलनामुळे मुंबईत प्रचंड गर्दी झाली असून काही आंदोलकांनी नवी मुंबईतील वाशी इथं जाऊन तिथं आंदोलन सुरू करावं, अशा सूचना जरांगे यांनी केल्या आहेत. दरम्यान, मराठा आंदोलनामुळे आझाद मैदानाच्या दिशेनं येणाऱ्या विविध मार्गांवर वाहतुक पोलिसांनी निर्बंध घातले आहेत.

मराठा आंदोलनामुळे मुंबई महापालिका परिसरातील सर्व रस्ते, पूर्व द्रुतगती महामार्ग, पूर्व मुक्त मार्गांवर वाहतुकीची कोंडी झाली आहे. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी पूर्व

मुक्त मार्गांवर त्यांच्या गाड्या थांबवल्या होत्या. परंतु तिथून अनेकजण पायी आझाद मैदानात दाखल झाले. आंदोलकांनी छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या समोरील रस्त्यावर ठिय्या दिला असल्यान इथली वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली आहे. सुमारे तीन हजार गाड्यांचा ताफा मुंबईत दाखल झाला आहे. पाच हजार लोकांनाच आझाद मैदानात प्रवेश दिला जाणार असं पोलिसांनी आंदोलकांना सांगितलं होते.

**<><><><>**

जालना जिल्ह्यामध्ये जाफराबाद तालुक्यात भरधाव वेगाने जाणारी गाडी रस्त्यालगतच्या विहीरीत पडल्याने झालेल्या अपघातात पाच जण ठार, तर २ जण जखमी झाले. जाफराबादमध्ये राजुर-टेंभुर्णी मार्गावरच्या गाडेगव्हाण फाटा इथं हा अपघात झाला. ही गाडी मेहकर तालुक्याच्या दिशेने जात असताना रस्त्यावर सकाळी फेरफटका मारणाऱ्या दोन स्थानिकांना वाचवण्याच्या प्रयत्नात विहिरीत पडल्याची माहिती मिळत आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या दोघांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे.

**<><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात दोन दुचाकी समोरासमोर धडकून झालेल्या अपघातात २ जण जागीच ठार तर ४ जण गंभीर जखमी झाले. ही घटना संग्रामपुर तालुक्यातल्या एकलारा बानोदा ते वरवट बकाल रस्त्यावर  काल संध्याकाळी घडली.

**<><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे. **बीड** जिल्ह्यात अनेक तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतपिकांचं नुकसान झालं असून, प्रशासनानं गाव पातळीवर पंचनामे करून आर्थिक भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अनेक ठिकाणी पुराचं पाणी नागरी वस्त्यांमध्ये शिरल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. **कोल्हापुरातही** राधानगरी धरणातून पाण्याचा विसर्ग आज वाढवला, आज दुपारी धरणाचा अणखीन एक स्वयंचलित दरवाजा पुन्हा उघडला. **लातूरमध्ये** अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. **नांदेडमध्ये** विष्णूपुरी धरण प्रकल्पात झालेल्या जोरदार पावसामुळे प्रकल्पाचे ११ दरवाजे उघडले असून,  गोदावरी नदी पात्रात १ लाख २९ हजार ७४३ क्युसेक वेगानं विसर्ग सुरू आहे. पोचमपाड धरणातूनही ५ लाख क्युसेक विसर्ग सुरु आहे.

**परभणीत** गेले दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. पावसामुळे अनेक ठिकाणचे रेल्वे ट्रॅक पाण्याखाली गेल्यानं नांदेड विभागातल्या गाड्या पर्यायी मार्गानं वळवल्या आहेत. गंगाखेड इथला मासोळी प्रकल्प पूर्ण क्षमतेनं भरला असल्यानं, आसपासच्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**अकोल्यात** अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी निवासी वसाहती पाण्याखाली गेल्या आहेत. पावसाचा जोर वाढल्यानं **हिंगोलीत** वसमत आणि औंढा तालुक्यातल्या, तर **यवतमाळमध्ये** उमरखेड इथल्या शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनानं नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**वाशीमध्येही** नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत. सोंडा ते अनसिंग दरम्यान पुलावरून पाणी जात असल्यानं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

//<><><><>//